Research Article

# कोरिया युद्ध

*कृष्णा मालकर*

उपप्राचार्य व इतिहास विभाग प्रमूख , श्री आ. भा. महाविद्यालय देवगाव (रं) , ता. कन्नड. जि औरंगाबाद.

***सारांश :***

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात दोन महासत्ता अमेरिका व सोवियत संघाचा उदय झाला. या महासत्तांमध्ये छुत्या युद्धाला/अप्रत्यक्ष स्पर्धेला सुरूवात झाली यालाच शितयुद्ध असे म्हणतात. व दोन महासत्तील शितयुद्धाची आक्रमक स्वरूप म्हणजे ''कोरियन युद्ध'' होय. कोरियन भुभागामचे १९४८ मध्ये उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया असे विभाजन करण्यात आले. विभाजीत सोवियत संघ व अमेरिका या महासत्तेंनी साम्यवाद व लोकशाहीच्या स्थापनेसाठी कोरियन भुभागातील नवीन देशांना प्रोत्साहन दिले. दोन्ही महासत्तांकडून कोरियन भुभागवर वर्चस्व स्थापन करण्यासाठी स्पर्धा लाभली याची परिणीती १९५० मध्ये कोरियन युद्धात झाली.[१]

***प्रस्तावना :***

कोरियन भुभाग चिन व जापान या देशाच्यामध्ये स्थित असून. अमनोक्कांग (Ùegueg) Amnokkang (Yalu) आणि तुमनगंगा (तुमेन) Tuman-gang (Tumen) या नद्यांनी कोरियन भुभागची उत्तरी सिमा निर्धारित केली आहे. तुमेन नदीने रशियाला मंचुरिया पासुन वेगळे केले आहे. कोरियन भुभागाच्या उत्तर बाजुस कोरियन उपसागर (Korean Bay) असुन दक्षिणेत पिवळा समुद्र (Yellow Sea) तर पुर्व सुमद्र (East Sea) स्थित आहे. कोरियाचा पुर्ण भुभाग २२,१५४ स्वे.कि.मी. मध्ये स्थित आहे.[२]

**कोरियन इतिहास :**

अकराव्या शतकात कोरियन भुभाग मंचुरियाच्या अधिपत्याखाली होता. मात्र पंधराव्या शतकात चिनसोबत झालेल्या लढाईमुळे चिनने कोरियाला अमनोक्कांग आणि तुमेन नदीच्या दक्षिणेला सिमीत केले व चिन-कोरिया दरम्यान कायम स्वरूपाची सिमा म्हणून घोषीत केले.[२] प्रथम चिन (सिनो)- जापान युद्ध (१८९४-९६) या युद्धामध्ये जपानने चिनचे कोरिया वरील सर्वस्व संपुष्टात आणले व कोरियन भूभागाला जापाने संरक्षण प्रदान केले. १९०५ मध्ये जापान-रशिया युद्धामध्ये जपाने रशियाच्या पराभव केला व इयुल्सातह (Eulsa Treaty) १९०५ नुसार जपानने कोरियाला अधिपत्याखाली आणुन वर्चस्व स्थापीत केले. पुढे १९१०-१९४५ मध्ये कोरिया जापानची वसाहत म्हणुन होती.[३]

दुसऱ्या महायुद्धात १९४५ मध्ये जपानच्या पराभवाने कोरियन भू-भागात जपानची असलेली वसाहत संपुष्टात आली. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर दोन महासत्तची सोवियत संघ व अमेरिका यांच्या मध्ये शितयुद्धाला सुरूवात झाली. दोन महासततामधील शितयुद्धामुळे दोघांनी आप आपला प्रभाव कोरियन भू-भागत वाढवण्यास सुरूवात केली. परिणामतः ऑगस्ट १९४५ करारानुसार कोरियन भू-भागाचे विभाजन होऊन १९४८ मध्ये उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया नवीन देश निर्माण झाले. उत्तर कोरिया व दक्षिण कोरयामध्ये ३८° अंश समांतर रेषेला आंतरराष्ट्रीय सिमा म्हणून घोषीत करण्यात आले.[४] सोवियत संघाने उत्तर कोरियामध्ये तर अमेरिकेने दक्षिण कोरियामध्ये सैन्य ठेवले.

दक्षिण कोरियामध्ये अमेरिकेने लोकशाहीला प्रोत्साहन देत ऑगस्ट १९४८ मध्ये सिंगमनरीच्या नेतृत्वामध्ये कोरिया गणतंत्र (The Republic of Korea) ची स्थापना करण्यात आली तर उत्तर कोरियामध्ये सोवियत संघाच्या साम्यवादाचे वर्चस्व होते. येथे सप्टेंबर १९४८ मध्ये किम उलसुंगच्या नेतृत्वाखाली कोरियाई जनवादी गणतंत्र (Democratic People's Republic of Korea) ची स्थापना करण्यात आली.)[५]

सप्टेंबर १९४८ उत्तर कोरियाच्या साम्यवादी सरकारची स्थापना झाल्यानंतर सोवियत संघाने आपले सैन्य या भागातुन परत घेतले मात्र अमेरिकने ऑगस्ट १९४८ मध्ये लोकशाही पद्धीतने सरकार स्थापन करून डिसेंबर १९४९ मध्ये मॉस्को कराराने सैन्य माघारासाठी अमेरिका, सोवियत संघ, इंग्लंडने संयुक्त कमीशनची नेमणुक करण्यात आली होती. त्यानुसार अमेरिकेने दक्षिण कोरियामधुन सैन्य परत घेतले.[६] सोवियत संघ व अमेरिकेचे सैन्य परण्यापुर्वी महासत्तांनी उत्तर कोरिया व दक्षिण कोरियामध्ये नवीन स्वतंत्र्य सरकारची स्थापना केली.

उत्तर कोरियातील नवीन साम्यवादी सरकार किम उल सुंग आणि दक्षिण कोरियातील नवीन लोकशाही वादी सरकार सिंगमनरी यांच्या नेतृत्वात स्थापन करण्यात आले होते. मात्र या नवीन नेतृत्वांना कोरियन भूभागाचे झालेले विभाजन मान्य नव्हते. उत्तर कोरियन व दक्षिण कोरियन नेतृत्त्वाला एकत्रीत कोरिया हवा होता. कोरियाच्या एकत्रीकरणा विषयी मार्च १९४६ मध्ये सोवियात संघ व अमेरिकेने संयुक्त कमीशनची स्थापना केली होती. मात्र या संयुक्त कमीशनला यामध्ये अपयश आले. उत्तर कोरिया व दक्षिण कोरियन सरकारला कोरियन भुभागाचे एकत्रीकरण स्वतःच्या सरकार अंतर्गत हवे होते. या एकत्रीकरणासाठी २५ जून १९५० मध्ये साम्यवादी उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण करून **कोरियन युद्धाला** सुरूवात केली.[७]

**कोरिया युद्ध २५ जून १९५० ते २७ जुलै १९५३ :**

**पार्श्वभुमी :**

उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम उल सुंग यांनी १९४९ मध्ये दक्षिण कोरिया विरूद्ध मॉस्को (सोवियात संघ) चा दौरा करून स्टॅलिनचा पाठिंबा मिळवला. मात्र १९४९ मध्ये अमेरिकेची दक्षिण कोरियामधील उपस्थितीमुळे स्टॅलिनने (सोवियत संघाचे अध्यक्ष) दक्षिण कोरियावर आक्रमणासाठी असहमती दर्शवली. सप्टेंबर १९४९ मध्ये सोवियत संघाने अणुबॉम्बची यशस्वी चाचणी घेतली. व १९५० च्या मध्यापर्यंत दक्षिण कोरियामधुन अमेरिकन सैन्य परतल्याने परिस्थतीमध्ये बदल धडून आल्याने आक्रमणासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली होती.

तत्पूर्वी १९४९-५० या कालावधीमध्ये उत्तर कोरियाने सोवियत संघाकडून मोठ्याप्रमाणात शस्त्रे मिळाली होती. तसेच १९४९ मध्ये चिनमध्ये साम्यवादी क्रांतीच्या विजयाने चिननेही शस्त्रे-अस्त्रे उत्तर कोरियाला दिली. या अधिकच्या सैनिकी मदतीमुळे उत्तर कोरिया हा दक्षिण कोरियापेक्षा खुप अधिक सैनीकी दृष्ट्या शक्तिशाली होता. या स्थितीत कोरियन भूभागाला पुन्हा एकत्रीत करण्याच्या भावनेतुन सोवियत संघानेही एप्रिल १९५० मध्ये उत्तर कोरियाला दक्षिण कोरियावर आक्रमणास परवागी दिली. तसेच आवश्यकता भासल्यास चिनकडून मदती संदर्भात आश्वासन घेण्यात आले. मात्र युद्ध काळात सोवियत संघ प्रत्यक्ष युद्धापासुन अलिप्त राहण्याचे धोरण ठेवले. कारण सोवियन संघाला अमेरिकेशी प्रत्यक्ष युद्ध टाळायाचे होते. म्हणून अप्रत्यक्ष भुमिका पार पाडली.

सोवियत संघासोबत बनलेल्या योजनेनुसार उत्तर कोरियाने ११ जून १९५० मध्ये दक्षिण कोयिाला तीन राजनयीक (Diplomat) शांतता वार्तासाठी पाठवले मात्र दक्षिण
कोरियाने ही शांततावार्ता अमान्य केल्याने उत्तर कोरियाने दक्षिण कोरियाच्या पश्चिमेकडील ओंगजीम भुभाग (Ongjim Penisula) वर आक्रमण करून युद्धाला प्रारंभ केला असला तरी प्रत्यक्ष युद्धाला सुरूवात झाली नव्हती. २५ जून १९५० मध्ये प्रत्यक्ष ३८° समांतर रेषेला पार करून उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण करून दक्षिण कोरियाचे अध्यक्ष सिंगमनरीला ताब्यात घेवून राजधानी सेवुल (Seoul) वर ताबा मिळवला. पुढे सप्टेंबर १९५० पर्यंत दक्षिण कोरियाच्या दक्षिण पुर्वेकडील पुसान बंदशपर्यंत ताबा मिळवला.[८]

२५ जून १९५० रोजी उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर केलेल्या आक्रमणाच्या दिवशीच संयुक्त राष्ट्रामध्ये (ळ¬) उत्तर कोरियाला आक्रमण राष्ट्र म्हणून घोषीत केले होते. संयुक्त राष्ट्राने अमेरिकेन जनरल मॅकअथुर (General Macarthur) च्या नेतृत्वात संयुक्त राष्ट्राची सैन्य तुकडी दक्षिण कोरियाच्या मदतीसाठी पाठवण्यात आली.[९] १९५०च्या चिनीसाम्यवादी क्रांतीचा नेता माओ-त्से-तुंग यांनी चिन व आंतरराष्ट्रीय स्तरावर ''Hate American Campaign'' चालवले. माओचा पate American Complain प्रचार हा तैवान समुद्रध्वनी माधील (Taiwan Strait) अमेरिकेच्या ''lewJeeve Strait'' अमेरिकेच्या हस्तक्षेपा

विरूद्ध होता. यासाठी माओने मंचुरियामधील सैन्याला सुसज्ज केल्याने चिनची कोरिया युद्धामधील सहभागाची शक्यता निर्माण झाली. कोरियन युद्धामुळे अमेरिकेने ही संयुक्त राष्ट्राअंतर्गत जापानमधील अमेरिकन सैन्य वेगाने काढुन दक्षिण कोरियामध्ये आणली. तसेच पश्चिमी देशांनी अमेकिरन कार्यवाहीला पाठिंबा प्रदान केला. जनरल मॅकअयुर (General Macarthur) ने जापान मधील ७५००० सैन्यासह National Police Reserve Force ची स्थापना केली.

संयुक्त राष्ट्राने सैनिकी, आर्थिक, मेडिकल, मदत कोरियामध्ये युद्धासाठी जाहिर केली. संयुक्त राष्ट्राच्या मदतीने जनरल मॅकअथुरने उत्तर कोरियाला दक्षिण कोरियामधुन माघार घेण्यास भाग पाडले. त्याच वेळी सोवियात संघ व उत्तर कोरियाच्या दबावाने चिनने ३०००० सैन्याला उत्तर कोरियाच्या बाजुने युद्धात समाविष्ट केले. यामुळे पिछेहाट होणाऱ्या उत्तर कोरियाने पुन्हा वर्चस्व स्थापन करण्यास सुरूवात केली व सेवुल (Seoul) वर ताबा मिळवला.कोरीयन युध्दामध्ये चिनी सहभागाने पश्चिमी राष्ट्रानीही अमेरिकेला पाठिंबा दिल्याने युरोपातील शितयुद्ध आशियामध्ये पसरण्याची शक्यता निर्माण झाली.

संयुक्त राष्ट्राच्या महासभेमध्ये १९५० च्या शेवटी व १९५१ च्या सुरूवातीला तटस्थ राष्ट्रासह पश्चिमी देशांनी राजनयीक (Diplomatic) रित्या समस्येवर उपाय काढण्यासाठी भारताच्या नेतृत्वामध्ये सदस्य राष्ट्राचा आयोग नेमण्यात आला. एप्रिल १९५१ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या सैन्याने दक्षिण कोरियाची राजधानी सेवुल (एादल्) वर पुन्हा ताबा मिळवला व संयुक्त राष्ट्राच्या सैन्यांनी चिनी व उत्तर कोरियाच्या सैन्याला ३८° समांतर रेषेच्या पलीकडे पाठवले.

संयुक्त राष्ट्राच्या सैन्याने चिन व उत्तर कोरियाला ३८° समांतर रेषेच्या पलिकडे पाठवल्यानंतर अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रुमेत यांनी युद्धबंदी (Ceasfire) साठी प्रयत्नशिल होते. विषयी शक्यता वर्तवली. मात्र जनरल मॅकअथुरने कोरियन भूभागाचे दक्षिण कोरियाच्या अंतर्गत एककीकरणाने प्रेरित होऊन मंचुरियावर आक्रमण करून सोवियत संघाच्या नाविकदलाला (Navy) आव्हान दिल्याने, सोवियत संघाचा प्रत्यक्ष कोरियायुद्धात समावेश झाला. संयुक्त राष्ट्राच्या तुलनेत सोवियात संघाचे नाविकदल समतुल्य झालेल्या युध्दात ५ मिलीयन मनुष्यहानी झाली. तसेच जखमी झाले त्यांची संख्याही द्वितीय महायुद्ध व व्हिएतनाम युद्धापेक्षा अधिक होते. ४०००० मृत्यू तर १००००० वर जखमी झाले. वाढत्या मनुष्यहानीमुळे जुलै १९५१ पर्यंत युद्धबंदी केली.

**विवादः** १९५१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेमध्ये चिनवर आर्थिक निर्बंध लादण्यात आले. अमेरिकेने, सोवियत संघ व चिनशी वाटाघाटीने युद्ध थांबवण्यास प्रत्यन केले. सोवियत संघानेही यास सकारात्मक प्रतिसाद देत १० जुलै १९५३ मध्ये उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया दरम्यान शांतता वार्ता सुरू झाली. कोरियन युद्धाच्या समाप्तीनंतर ''युद्धकैदींचा'' गंभीर प्रश्न उद्भवला. युद्धकैदींचा प्रश्न सोडवण्यासाठी भारताच्या नेतृत्वात आयोग स्थापन करण्यात आला. २७ जुलै १९५३ मध्ये अरमिस्टिक कराराने (Armistice Agreement) शांतता वार्तावर हस्ताक्षर करण्यात आले.[१०] या करारानुसार कोरियन युद्ध कैदीना जगात तटस्थ राष्ट्रांमध्ये स्थायीक होण्याची परवागनी देण्यात आली तसेच. उत्तर व दक्षिण कोरिया दरम्यान नवीन ३८° समांतर रेषा आखण्यात येवून १५०० स्के.कि.मी. जास्तीचा भुभाग दक्षिण कोरियाला देण्यात आला.[३]

**भारताची भुमिका :**

भारताने स्वातंत्र्यानंतर १९४७ ते १९५४ या कालावधीमध्ये कोरियन विवादात रस दाखवला. भारत व कोरियामध्ये कोरियन भूभाग, प्रादेशिक, जागतीक प्रश्नाबाबत मतभेद होते. कोरिया संदर्भातील सप्टेंबर १९४७ - डिसेंबर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघात कोरियाच्या विरूद्ध भारत आपल्या मताचा उपयोग करेल. मात्र भारताने कोरियन प्रश्न संयुक्त राष्ट्राच्या मंचावर चर्चेसाठी उपस्थित करण्याविषयी मत मांडले. १९४८ मध्ये (ळ्ऊध्य्ख) ची स्थापना करून अध्यक्ष म्हणून भारताचे व्हि.के. मेनन यांची नियुक्ती केली. ळ्ऊध्य्ख अंतर्गत कोरियन भूभागात स्थिर राजकिय स्थिती व सार्वत्रिक निवडणूकांच्या पाहिणीसाठी स्थापना केली होती. संयुक्त राष्ट्रंसघातील भारताचे राजदुत व्हि.के. मेनन यांनी United Nations Temporary Commission On Korea (UNTOCK) च्या अध्यक्ष स्थानी असतांना महत्वपुर्ण भुमिका पार पाडली. भारताने कोरियाच्या पुर्ण स्वातंत्र्यासाठी पुर्णपणे पाठिंबा दिला होता. भारताने उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया दरम्यान शांततेच्या मार्गाने एककीरणा करण्यासाठी महत्व दिले होते.

भारत कोरिया यांच्यामध्ये कोरियाई युद्धामुळे पुन्हा संबंध स्थापीत झाला. भारताने संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदमध्ये ८२ व ८३ व्या प्रस्ताव (Resolution) ला २५ आणि २७ जुन १९५० मध्ये पाठिंबा दिला. दोन्ही प्रस्ताव (Resolution) मध्ये उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केल्याचे मान्य केले. त्याच प्रमाणे ७ जुलै १९५० मध्ये संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत ८४ व्या प्रस्ताव (Resolution) लाही भारताने पाठिंबा दिला. त्यानुसार दक्षिण कोरियावर झालेल्या आक्रमणाचा सामना करण्यासाठी सैन्य मदत पाठवावी. असे प्रस्ताव (ित्लूदह) होते. भारतालाही नुकतेच स्वातंत्र्य मिळाल्याने देशाबाहेर सैन्य मदत पुरवणे शक्य

नव्हते. त्यामुळे भारतातर्फे मेडीकल व मानवतेची मदत म्हणून संयुक्त राष्ट्र अंतर्गत एक ६० वी Indian Parashute Filed Ambulance of Indian Army Medical Core Ûee एकगट कोरियाला पाठवण्यात आला.

१९५३ मध्ये अरमिस्टीक (Armistice Agreement) च्या वेळी भारतीय विजयालक्ष्मी पंडीत या संयुक्त राष्ट्राच्या ८ व्या महासत्तेच्या अध्यक्ष होत्या. कोरिया विषयी अरमिस्टीक करारानंतर पुढचा मुद्दा कोरियाने युद्धामधील **२३००० युद्धकैदी** (Prisoners of War-Pow) चा होता. या युद्ध कैदी विषयी प्रश्न सोडवण्यासाठी संयुक्त राष्ट्राने Neutral Nations Repatriation Commission (NNRC) ची स्थापना केली. NNRC च्या अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी म्हणून पदासाठी भारतीय व्हि.के. मेननची नियुक्ती करण्यात आली होती. युद्ध कैद्यांची अदला बदल करण्यासाठी भारताच्या जनरल थिमय्याची नियुक्ती करण्यात आली. जनरल थिमय्याच्या अंतर्गत Indian Custodial Force (CFI) (काळजी वाहु लष्करी दल) ची स्थापना करण्यात आली होती. भारताने NNRC Je CFI मधील तटस्थ भुमिकेचे दक्षिण कोरिया सोडून सर्व देशांनी स्वागत केले.

१९५३ च्या अरमेस्टिक करारानुसार (Armistice) युद्ध कैद्यांना आपल्या देशाबाहेबर तटस्थ देशामध्ये स्थायीक होण्याची परवागी देण्यात आली होती. त्यानुसार ७६ कोरियन व १२ चिनी अशा एकूण ८८ युद्ध कैद्यांनी आप-आपल्या देशाकडे देशात परत जाण्यास नकार दिला व तटस्थ राष्ट्रामध्ये स्थायीक होण्याची इच्छा व्यक्त केली. भारत NNRC, CFI चा अध्यक्ष असल्याने **८ फेब्रुवारी १९५४** मध्ये ८८ युद्धकैदी भारतात आणण्यात आले. भारतात आल्यानंतर ८८ युद्धकैदीपैकी २ चिनी व ४ कोरियन युद्ध कैदी आपआपल्या देशात परतली. युद्धकैदी भारतात युद्धकैदी आणल्यानंतर तात्काळ भारत सरकारने संयुक्त राष्ट्रामध्ये कोरियन युद्धातील युद्धकैदी जबाबदारी घेतल्याचे सांगितले.[११]

८२ युद्धकैदींना NNRC मार्फत भारत सरकारच्या अंतर्गत हस्तगत करण्यात आले. यापैकी बऱ्याच युद्धकैद्यांनी तटस्थ राष्ट्रामध्ये स्थायीक होण्याची इच्छा व्यक्त केली असल्याने भारत सरकारने ही फेब्रुवारी १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्रामध्ये युद्धकैदी तटस्थ देशामध्ये स्थायीक होण्यासंदर्भात शिफारस केली. त्यांना स्थायीक करण्यापर्यंत युद्धकैदीची जबाबदारी भारतावर होती.[११] भारत, मॅक्सिको, दक्षिण अमेरिकेतील काही राष्ट्रामध्ये युद्ध कैद्यांना स्थायीक होण्यासाठी पाठवण्यात आले होते. कोरियन युद्ध कैदी भारतात असतांना भारत सरकारने कोठेही जाण्या-येण्याचे, राहण्याचे स्वतंत्र दिले. भारताच्या या भुमिकेवर भारतामध्ये काही प्रमाणात विरोध झाला. या संदर्भात भारतीय पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात की, ''एकंदरीत प्रशासकीय करण्याची कोरियन युद्ध कैदीता नागरीत्व प्रदान केले असले तरी त्याच्यावर भारतीय लष्काराचे नियंत्रण आहे.'' तसेच या युद्धकैदींचा उपयोग देशात प्रशिक्षणासाठी करण्यात आला. भारता अंतर्गत ८२ युद्ध कैद्यांपैकी ३१ युद्ध कैदी भारतामध्ये स्थायीक झाले. तर काही NNRC च्या इतर सदस्य राष्ट्रामध्ये स्थायीक झाले.[१२] भारत सरकारने कोरियन युद्धकैद्यांची पुर्नवासन ही आंतरराष्ट्रीय जबाबदारी समजली. जे युद्ध कैदी भारतामध्ये स्थायीक झाले. त्यांना मिळालेल्या सोयीसुविधांना भारत सरकार समाधानी होती.[१३]

भारताने कोरियन भूभागामध्ये शांतता स्थापीत होण्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी जगातील इतर देशांना सांगितले की ''कोरियाई समस्येत गृहयुद्ध असुन बाहेरील शक्तिनी या गृहयुद्धापासुन दुर राहावे.'' भारतीय तटस्थ भुमिकेला कोणी नाकारू शकत नव्हते. मात्र दक्षिण कोरियाच्या मते भारताची तटस्थ ही उत्तर कोरियाला मुक पाठिंबा समाजण्यात आला. तरीही ३००० भारतीय सैन्याची यशस्वी रित्या युद्धकैद्यांना प्रश्न सोडवला. कोरियाई समस्या सोडविण्यासाठी नुकतेच स्वातंत्र मिळालेल्या भारताल कोरियाई समस्येत यश मिळाले.

**निष्कर्ष :**

कोरिया युद्धामध्ये अलिप्त वादाच्या तत्त्वाज्ञानावरील भारताची श्रद्धा व शांततेशी असलेली बांधिलकीची कठोर परिक्षा घेतली गेली. भारताने तटस्थ राष्ट्राच्या अध्यपदी असतांना युद्धकैदीची समस्याही यशस्वी रित्या पार पाडली. भारत कोरियन युद्धामध्ये कोणत्याही महासत्तेचा पक्ष न घेता. सर्व देशांना कोरियन भूभागापासून दुर राहण्यासाठी सांगुन तटस्थपणे कोरियन युद्धात मध्यस्थाची भुमिका पार पाडली. या तटस्थ पणामुळे भारताच्या अलिप्तवादी भुमिकेला पाठबळ मिळाल्याने जगाला अलिप्तवादाची कळून चुकले.[१४] अलिप्तवाद म्हणजे भेदरट पणाची, तटस्थता अथवा बाष्कळ बडबड अशी संभावना करणे कठीण झाले. भारतानरे कोरियन युद्धानिमित्त अलिप्तवादाचे उत्तम उदाहरण जगासमोर ठेवले.

**संदर्भ :**


1) *Geography - Asianifo.orgsupport I.C.S.Y. H.O.P.E. International Cooperation of Environment Youth - Helping out Polluted Earth.*
2) *Ibid.*
3) *Wikipedia.*
4) *Old HCERT world history chapter - 13, Flower world II, Class - 10th.*
5) *Wikipedia.*
6) *Comparative Politice and International Relation - Prakash Chander, Prem Arora Cosmos Bookie (P) LTD. 26th edition, 2010, Delhi - Page. 187.*
7) *Ibid.*
8) *Wikipedia*
९) *जैन माथुर - आधुनिक विश्व इतिहास १५०० ते २०००, जैन प्रकाश मंदिर, जयपुर, मार्च - २०१०.*
10) *William Stack - The Korean War in World History, March 2010.*
11) *Government of India - Foren Ministry Doc. NNRC Report - 1956.*
12) *Ibid, 1956.*
13) *Government of India - Foren Ministry Doc. NNRC Report - 1956. PM Stated - 12 April 1955.*
14) *Government of India - Foren Ministry Doc. NNRC Report - 10 Aug. 1955.*
15) *India Since Independence - Page No. 225.*
१६) *(डॉ) दत्त व्ही.पी. (नरेंद्र तोमर), स्वतंत्र भारत की विदेश निती, एन.बी.टी. २००९, नवी दिल्ली, पृ.क्र. १६*